# छत्रपती शाहू महाराज यांची शेती, औद्योगीकरण आणि सहकार या क्षेत्रातील योगदान

**प्रा. धनाजी नारायण कठरे** सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र दादासाहेब ज्योतीराम गोडसे आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेज वडूज' ता- खटाव जि-सातारा

---

**प्रस्तावना**

छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे एक दृष्टे राजे होते.समाजमनाची नस त्यांनी ओळखलेली होती. भारताच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासात छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे शेती, शिक्षण, सहकार आणि औद्योगीकरणासाठी दिलेले योगदान कोणीही विसरू शकत नाही. इतके महत्त्वाचे आहे. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राजपदाचा वापर समाजातील रंजल्या-गांजल्या लोकांच्या कल्याणासाठी केला. शाहू महाराजांच्या विचारांचा आणि कर्तुत्वाचा आवाका प्रचंड मोठा होता. जगाचा इतिहास, राजकारण आणि अर्थकारण या विषयाचे मुलग्राही ज्ञान त्यांनी संपादन केले होते. १८२१ ते१८८४ या काळात कोल्हापूर संस्थानच्या इतिहासात एक अंधार युग नांदत होते. गादीची अप्रतिष्ठा होत होती. प्रदेशाची लचकेतोड चालली होती. राजघराण्यात अंत:कलह होते. छत्रपतीचे अकाली अपमृत्यू घडत होते. १८७५ मध्ये कागलच्या घाटगे घराण्यात जन्माला आलेले शाहू महाराज वयाच्या दहाव्या वर्षी दत्तक विधानाने करवीरच्या राजघराण्यात प्रविष्ट झाले. १८९४ मध्ये त्यांनी राज्य सूत्रे हाती घेतली. त्या पुढची 28 वर्षे म्हणजे 1922 मध्ये त्यांनी इहलोक सोडला. तोपर्यंत त्यांचे कर्तुत्व विकसित होत गेले .त्यांची कर्तृत्वसंपन्न कारकीर्द हे महाराष्ट्राच्या इतिहासातील तेजस्वी पर्व ठरले.

छत्रपती शाहू महाराज अधिकारपदी विराजमान झाले. तेव्हा देशभर स्वराज्यासाठी धडपड सुरू झाली होती.महाराष्ट्र, पंजाब, बंगाल या प्रांतात कडवे क्रांतिकारक बंड करण्याच्या तयारीत होते. हे सर्व दडपून टाकण्यासाठी इंग्रज शस्त्रसज्ज होते. देशातील अनेकांच्या राष्ट्रभावनेला भरते आले होते.छत्रपती शाहू वयाने त्यावेळी लहान होते पण विवेकी आणि धोरणी होते. इंग्रजांविरुद्ध उघड लढा देऊन सगळे संस्थान संकटात लोटण्याऐवजी सत्तेचे साधन हाती ठेवून प्रजेचे उत्थान घडवावे असे त्यांना वाटले. त्यांनी जन्मभर बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीचे स्वप्न पाहिले आणि ते साकार करण्यासाठी सर्वस्व पणाला लावले.स्वराज्य म्हणजे मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे नव्हे, हे ओळखून अखिल समाजातील आबाल-वृद्धांची मते एकात्मतेच्या सूत्रात गुंफण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यासाठी शेती, शिक्षण व औद्योगीकरणाच्या विकासावर भर देऊन बहुजन समाजाच्या आर्थिक उन्नतीमध्ये भर घालण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

**छत्रपती शाहू महाराजांचे शेती क्षेत्रातील योगदान**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतीचा उद्धार म्हणजे शेतकऱ्यांचा उद्धार पर्यायाने देशाचा उद्धार हे सूत्र ध्यानात घेऊन राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या करवीर संस्थानात शेतीसाठी मूलभूत सुधारणा केल्या. आज महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा शेती, उद्योग धंदे ,सहकार या क्षेत्रात अग्रेसर आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात शाहू महाराजांच्या कारकिर्दीत या प्रगतीचे पायाभरणी झाली होती.त्याच काळात कोल्हापूर संस्थानात सुरू झालेली हरितक्रांती ही महाराष्ट्रातील पहिली हरित क्रांती होती. त्या क्रांतीचे श्रेय महाराजांच्या दूरदृष्टीकडे व कल्याणकारी पुरोगामी धोरणाकडे जाते. त्यावेळी शेतकरीवर्ग अज्ञान व दारिद्र्याच्या गर्तेत खितपत पडलेला होता.त्याला अज्ञानामुळे सामाजिक मागासलेपण व दारिद्र्यामुळे बहुतेक मागासलेपण प्राप्त झाले होते. त्यातच आणखी भर म्हणून दुष्काळ आणि प्लेग यासारखी अस्मानी संकटे कोसळत होती. या संकटांमध्ये आपली रयत भरडली जात असल्याचा अनुभव त्यांनी घेतला होता. त्यावेळी दुष्काळाच्या कालखंडात प्रजेला अन्नधान्य व त्यांच्या जनावरांना गवत चाऱ्याचा पुरवठा करून त्यांना मृत्यूच्या तडाख्यातून वाचविण्याचे कर्तव्य शाहू महाराजांनी चोखपणे पार पाडले. दुष्काळावर कायमची मात करण्यासाठी 1902 साली त्यांनी आपल्या संस्थांनासाठी 'सार्वजनिक पाटबंधारे धोरण 'जाहीर केले. त्यासाठी पाटबंधारे खाते निर्माण करून त्यावर खास इरिगेशन ऑफिसरची नेमणूक केली. या खात्यामार्फत संस्थानातील प्रत्येक गावाची पाठबंधाऱ्याच्या दृष्टीने पाहणी करण्यात आली. नव्या जुन्या विहिरी, छोटे-मोठे तलाव, लहान-मोठे बंधारे या सर्वांच्या नोंदी करून त्याच्या दुरुस्तीची कामे सुरू केली. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा प्रत्येक स्तोत्र अडविण्याचा प्रयत्न सुरू झाला.

1902 साली छत्रपती शाहू महाराज युरोपच्या दौऱ्यावर गेले. तेथील देश व समाज परिस्थितीचे त्यांनी बारकाईने निरीक्षण केले. यूरोपातील लोकांनी निसर्गातील साधनसंपत्तीचा प्रत्येक स्त्रोत मोठ्या कल्पकतेने आपल्या भौतिक प्रगतीसाठी वापरल्याचे पाहून ते प्रभावित झाले. आपणही त्याचे अनुकरण का करू नये, असे विचार त्यांच्या मनात आले. तेव्हा त्यांनी कोल्हापूर संस्थानात राधानगरी धरण बांधण्याचा निश्चय केला. राधानगरी धरणाचा प्रकल्प महाराजांनी प्रत्यक्ष हाती घेतला. 1909 साली धरणाचे प्रत्यक्ष बांधकाम सुरु झाले.1918 सालापर्यंत 14 लाख रुपयांची रक्कम त्यावर खर्ची पडून धरणाचे 40

फुटापर्यंत बांधकाम पूर्ण झाले. दरवर्षी 600 दशलक्ष घनफूट पाणी शेतीसाठी उपलब्ध होऊ लागले. ते पाणी जशी गरज भासेल असे नदीत सोडण्यात येऊ लागले. भोगावती नदीच्या दोन्ही तीरावर बारमाही हिरवीगार शेती फुलू लागली.असा महान प्रकल्प हाती घेण्यासाठी पहाडासारखे कणखर दिल असणारा राजा असावा लागतो हे यावरून दिसून येते.

शेतकऱ्यांमध्ये शेतीतील आधुनिक ज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे या हेतूने शाहू महाराजांनी अनेक उपक्रम हाती घेतले. कोल्हापूर संस्थानात सुधारित शेती पद्धतीचा प्रसार करण्यासाठी 1912 साली त्यांनी किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट ही संस्था स्थापन केली. कोल्हापूरमध्ये आधुनिक शेती अवजारांचे एक म्युझियम सुरू केले. शेतकऱ्यांना सुधारित अवजारे, बी-बियाणे, रासायनिक खते आणि आधुनिक मशागतीच्या पद्धती यांचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी खास कृषी अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या.शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठीची गोडी लागावी म्हणून संस्थानात महालक्ष्मी रथोत्सव, जोतिबा यात्रा अशा प्रसंगी शेतकरी प्रदर्शने भरवण्यात सुरुवात केली. या प्रदर्शनातून शेतीची आधुनिक साधने, उत्कृष्ट उत्पादनाच्या धान्याचे नमुने, माहिती पत्रके यांची मांडणी केली जात होती. तसेच उत्तम पैदाशीच्या जनावरांची प्रदर्शने भरवली जात असत. काही वेळा शेती प्रदर्शना बरोबर विज्ञान प्रदर्शने आयोजित केली.आपल्या प्रजेत विज्ञानाविषयी गोडी उत्पन्न व्हावी, असे महाराजांचे मत होते.विशेषतः शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने अशा प्रदर्शनाकडे यावा, म्हणून त्यासोबत कुस्त्यांच्या दंगली, मर्दानी खेळांचे सामने, हत्तीच्या झुंजी यासारखे करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले जात असत.

शेतीच्या क्षेत्रात शाहूमहाराजांनी दाखविलेली प्रयोगशीलता वाखाणण्यासारखे होते. संस्थानात ऊस, भात, ज्वारी, भुईमूग, कडधान्ये ही पारंपरिक पिके काढली जात होती .पण याशिवाय चहा, कॉफी, रबर,वेलदोडे,कोको यासारखी येथे कधीच न घेतलेली उत्पादने घेता आली तर मराठी संस्थांच्या शेतीचा कायापालट होईल, असे महाराजांना वाटत होते. त्यासाठी संस्थांच्या पश्चिम भागात मुबलक पर्जन्यमान असणाऱ्या सह्याद्रीच्या रांगात उतार जमिनीवर त्यांनी चहा, कॉफी, रबर यांचे मळे तयार केले यापैकी चहाच्या मळ्याचा प्रयोग अपेक्षेपेक्षा यशस्वी झाला. उत्कृष्ट दर्जाचा चहा कोल्हापूर संस्थानात उत्पादित होऊ लागला. व्यापारी तत्त्वावर चहाचे उत्पादन सुरू होऊन पन्हाळा चहा नंबर 4 या नावाने तो संस्थांना बाहेर जाऊ लागला. हिंदुस्थानातील राजे राजवाडे यांना पाठविला जाऊ लागला. हा चहा बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या खास आवडीचा चहा बनला. मात्र शाहू महाराजांनंतर चहाच्या मळ्याच्या शेतीकडे फारसे कोणी गांभीर्याने पाहिले नाही आणि पन्हाळा चहा काळाच्या ओघात इतिहासजमा झाला.अशा रीतीने शाहूमहाराजांनी शेती क्षेत्राला योगदान देऊन शेतकरी व शेती विकसित करण्यासाठी योगदान दिले. त्यासाठी अतोनात प्रयत्न केले.

**उद्योगधंद्यांच्या क्षेत्रातील शाहू महाराजांचे योगदान:.**

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात नवे उद्योग सुरू करून लोकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न केले.उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने औद्योगिक सर्वेक्षणही करून घेतले आणि त्यानुसार लोकांनी उद्योग सुरू करावेत, म्हणून त्यांना प्रोत्साहन देऊन उद्योगधंद्याला चालना दिली. कोल्हापूर संस्थानात सुगंधित औषधी तेल उद्योग, मधुमक्षिका पालन उद्योग, काष्ठार्क आणि सुती कापड उद्योग सुरू केले. त्यासाठी प्रशिक्षण घेण्यासाठी संस्थानातील लोक इतर देशांमध्ये पाठविले. मुंबईत भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनात कोल्हापूर संस्थानात उत्पादित झालेल्या अशा प्रकारचे नमुने पाठवण्यात आले आणि विशेष म्हणजे या प्रदर्शनात ही कोल्हापुरी तेले तज्ञांच्या प्रशंसेस पात्र ठरली आणि कोल्हापूर संस्थानास चांदीचे पदक बहाल करण्यात आले. कोल्हापूर संस्थानाने काष्ठार्क उद्योगात प्राप्त केले. सह्याद्रीच्या वनविभागात मिळणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या वनस्पतींच्या लाकडाच्या पट्ट्या लावून त्यापासून लोणारी कोळसा, व्हिनिगर आणि डांबर हे पदार्थ उत्पादित केले आणि त्याचे नमुने मुंबई, कलकत्त्याच्या 'चेंबर ऑफ कॉमर्स 'या संस्थेकडे पाठविले. तसेच अमेरिका व जपान या देशातील प्रयोग शाळांकडे तज्ञांच्या परीक्षणासाठी ही पाठविले गेले. काही काष्ठार्क मैसूरच्या प्रदर्शनात ठेवले होते.तेथे ही त्याची शास्त्रीय गुणवत्ता तज्ञांच्या पसंतीस पडून कोल्हापूर संस्थानाला चांदीचे पदक देण्यात आले. कोल्हापूर गुळाची प्रसिद्धी शाहू महाराजांच्या काळातच सर्व देशभर झालेली होती. उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणेने कापड गिरणीचा उपक्रम हाती घेण्यात आला आणि 1906 साली 'दि शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विव्हिंग मिल्स 'या कापड गिरणीची स्थापना केली गेली.यामुळे कोल्हापुरातील शेकडो लोकांना रोजगार उपलब्ध झाला. याशिवाय कोल्हापूर संस्थानात शिरोळ, इचलकरंजी, गडहिंग्लज इत्यादी ठिकाणी अनेक 'जिनिंग फॅक्टरी' स्थापन झाल्या.1912 -1913 च्या सुमारास या संस्थानात पहिली ऑइल मिल,पहिली सॉ मिल,पहिली फाउंड्री फॅक्टरी, पहिली इलेक्ट्रिक कंपनी, पहिली मोटार ट्रान्सपोर्ट कंपनी असे अनेक उद्योग सुरू झाले. निरनिराळ्या उद्योगासाठी प्रशिक्षित कामगार तयार व्हावेत म्हणून 'राजाराम इंडस्ट्रियल स्कूल'स्थापन करण्यात आले. संस्थानातील लहान मोठ्या उद्योगांना अल्प मुदतीची कर्जे सरकारकडून देण्याची व्यवस्था करण्यात आली.1912 साली सहकारी संस्था विषयक कायदा लागू केला.1913 साली कोल्हापूरमध्ये 'दि

कोल्हापूर अर्बन को ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड' ही पहिली सहकारी संस्था भास्करराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाली. सहकाराच्या माध्यमातून संस्थानाचा विकास छत्रपती शाहू महाराजांनी साधण्याचा प्रयत्न केला. सहकार क्षेत्राला उत्तेजन देऊन ग्रामीण व शहरी भागाचा कायापालट करण्याचे कार्य त्यांनी केले. पुढे महाराष्ट्र राज्य आणि संपूर्ण देशभर ते कार्य पोहोचल्याचे दिसते. शाहू महाराजांच्या दूरदर्शीपणा मुळे सहकार क्षेत्राला चांगले दिवस आले आणि सर्वसामान्य लोकांना विकासाचा वाटा मिळू लागला. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज यांनी घालून दिलेल्या आदर्शावरच महाराष्ट्राने पुढे प्रगतीचे शिखर गाठलेले दिसते.

छत्रपती शाहू महाराज हे करवीर नगरीचे आद्य शिल्पकार होते.त्यांचे संस्थान शैक्षणिक औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक क्रांतीचे केंद्र बनले. शाहूपुरी हे गुळ व्यापाराचे केंद्र बनले. तर शाहू मिल व इतर उद्योगधंद्यांमुळे ते औद्योगिक केंद्र बनले.शाहू महाराज आणि जनतेच्या अडीअडचणी समजून घेतल्याआणि त्या सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपले राजेपण केवळ जनतेच्या हितकल्याणासाठी व सुखासाठी उपयोगात आणले. छत्रपती शाहू महाराजांनी कृषी कर्माला महत्त्व देण्यासाठी शेती प्रगतीला महत्त्व दिले. शेती ही श्रमाची प्रतिष्ठा जगात सर्वात मोठी मांडली. शेतकरी सक्षम बनला पाहिजे, यासाठी शेती उत्पादन वाढविण्यावर भर दिला आणि शेतीमालाचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे याची व्यवस्था केली. पाटबंधारे आणि धरणे बांधून शेतकऱ्यांचे जीवनमान बदलून टाकले.दुष्काळी परिस्थितीवर मात करायला त्यांनी लोकांना शिकविले. आधुनिक काळातील शासनकर्त्यांनी आणि सरकारने त्याचा आदर्श घेतला तर भविष्यात अशा समस्या निर्माण झाल्या तर त्यातून मार्ग काढता येईल. शाहू महाराजांची दूरदृष्टी आजही पथदर्शी ठरत आहे. म्हणून छत्रपती शाहू महाराजांचे शेती, औद्योगीकरण आणि सहकार या क्षेत्रातील योगदान आजच्या पिढीला तसेच येणाऱ्या भावी पिढ्यांना ही प्रेरणादायी मार्गदर्शक व दिशादर्शक ठरणार आहे.

**संदर्भ सूची**

१. दीपस्तंभ -प्राचार्य शिवाजीराव भोसले.

२. शाहूंच्या आठवणी-प्रा. नानासाहेब साळुंखे

३. राजश्री श्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग-वा.द. तोफखाने

४. राजर्षि एक व्यक्ति दर्शन-श्याम येडेकर

५. राजर्षी शाहू पंच अखंड आत्मक स्मारक ग्रंथ खंड 1, 2 आणि 3 संपादक डॉक्टर जयसिंगराव पवार डॉक्टर मंजुश्री पवार

६. लोकराजा शाहू छत्रपती-रमेश जाधव

७. लोकमत,26 जून 2020